**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६५०/२०२६**
**निशाणी क्रमांकः- ११ खाली**
**ओमप्रकाश यादव व इ. वि. कोणीही नाही.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नावः- अमितकुमार यादव

**सरतपास अर्जदार तर्फे वकील श्रीमती. रेशमा पाटील यांचे मार्फत सुरू**

**०१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. माझ्या आईच्या मृत्यूच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१२** देण्यात येत आहे. माझ्या आई व वडिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या नोदणीकृत करारनामा क्र.१३१९४/२०१० ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१३** देण्यात येत आहे. वडिलांच्या नावे असलेल्या रेशनकार्डची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१४** देण्यात येत आहे.

**०२.** दैनिक किल्ले रायगड या पेपरमध्ये दि.०१/०१/२०२६ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.04.04 17:28:42 +0530

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**
**दिनांकः- ०४/०४/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**